बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०९ नोव्हेंबर २०२५**

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७८१/२०२५ भा. न्याय संहिता कलम ३०५(अ) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/१०/२०२५ रोजी २२.३० वा चे सुमारास, शिवाजी चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०८/११/२०२५ रोजी २१.०९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रसाद प्रभुलिंग देशमुख, वय- ३४ वर्षे, रा. ९५/२, सालेश्वर हौसिंग सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १०,०००/- रु रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या शिवाजी चौक, सोलापूर येथील शिवशक्ती हॉटेल मध्ये एका अंदाजे १८ वर्षे वयोगटातील मुलाने गल्यामध्ये हात घालुन गल्यातील नमुद वर्णनाची रक्कम हि फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ४७२ कटारे |

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५९/२०२५ भा. न्याय संहिता कलम १०९,११८(२),११८(१),११५(२),१८९(२),१९१(१), १९१(२),१९०,३५२,३५१(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०६/११/२०२५ रोजी ०२.४५ वा चे सुमारास, साईबाबा चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०८/११/२०२५ रोजी ०२.४६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सागर भिमराव पवार, वय- २६ वर्षे, रा. ०७, न्यु झोप. साईबाबा चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सुनिल पुजारी, २) संदिप बंदपट्टे, ३) दिलीप ऊर्फ अब्बु शिवाजी बंदपट्टे, रा. न्यु झोप. साईबाबा चौक, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील चुलत भाऊ दत्ता पवार याचे मोबाईलवर गल्लीतील आरोपीत क्रं. ३ याने फोन करुन सागर व कुमार यांना घेवून साईबाबा चौक येथे काल झालेले भांडण मिटवून घेवू असे म्हणाल्याने फिर्यादी व कुमार असे मिळुन नमुद ठिकाणी गेले असता तेथे आरोपीत क्रं. १ ते ३ हे होते त्यापेकी आरोपीत क्रं. १ याने शिवीगाळ करत यांना जिवंत सोडायचे नाही असे म्हणून हातातील लोखंडी रॉडने डोक्यात व डावे हातावर मारहाण केली व भाऊ कुमार यास आरोपीत क्रं. ३ याने हातातील काठीने डोक्यास व हातास मारहाण केली व त्यांचेसोबतचे इतर ३ ते ४ साथीदार यांनी हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करुन जखमी करुन तेथुन निघुन गेले आहेत म्हणून. तपास:- मसपोनि- बांभिष्टे- **८४५९८४४४५४** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५६०/२०२५ भा. न्याय संहिता कलम,११८(१),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०६/११/२०२५ रोजी १४.४५ वा चे सुमारास, साईबाबा चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. ०८/११/२०२५ रोजी २०.५८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सुनिल भिमाशंकर पुजारी, वय- २१ वर्षे, रा. ३३/३/३२, साईबाबा चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) कुमार बंदपट्टे, २) सागर पवार, ३) अभिजीत माने, सर्व रा. साईबाबा चौक, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी उभे असताना यातील नमुद आरोपीतांनी मिळुन दि. ०५/११/२०२५ रोजी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादीस शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली आहे. तसेच आरोपीत क्रं. १ याने हातातील लाकडाने फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२१६ किवडे- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ८८५/२०२५ भा. न्याय संहिता कलम,८५,११५(२),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २९/०७/२०२३ रोजी ते दि. ०१/१०/२०२५ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी, |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. ०८/११/२०२५ रोजी १९.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | रम्या तुळशीदास बिरु, वय- २६ वर्षे, रा. सुनिल नगर, कामगार वसाहत, घर नं. ६११/४, गोंदुताई विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) तुळशीदास- पती, २) लक्ष्मी- सासु, ३) नरसय्या- सासरे, ४) बालराज- दिर, ५) पूजा- जाऊ, सर्व रा. सुनिल नगर, कामगार वसाहत, घर नं. ६११/४, गोंदुताई विडी घरकुल, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील नमुद आरोपीत क्रं. १ ते ५ यांनी मिळुन फिर्यादीस माहेरुन २ लाख रुपये घेऊन ये तसेच तुझ्या पतीचे कर्ज फेडण्यासाठी फिर्यादीच्या गळयातील मंगळसुत्र मागणी करुन, फिर्यादीस मारहाण केली आहे व अर्वाच्च शिवीगाळ करुन दमदटी केली आहे. तसेच फिर्यादीस मानसिक व आर्थिक त्रास देऊन घरातुन हाकलुन दिले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ७४५- डोके- ९८२३८१३०३१ |

## सायबर पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | १३/२०२५ भा. न्याय संहिता कलम ३१६(२),३१८(४),३१९(२),३३६(२),३३७,३४०(२) ३५१(१),३(५), आयटी ॲक्ट ६६(सी),६६(डी) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०३/१०/२०२५ रोजी १६.०० वा ते दि. ०४/११/२०२५ रोजी १६.२७ वा चे दरम्यान, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. ०८/११/२०२५ रोजी १९.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | नारायणदास किसनदास भुतडा, वय- ६९ वर्षे, रा. १३२, जैन मंदिर जवळ, |

| | | |
|---|---|---|
| | | जोडभावी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) राजेश शर्मा, २) संदिप राव, ३) सर्व बँक खातेधारक व इतर साथीदार |
| **फसवणुक र.** | : | ४१,००,०००/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व त्यांची पत्नी हे घरी व दुकानात असताना फिर्यादी व त्यांची पत्नी यांचे मोबाईनवर प्रथम आरोपीत क्रं. १ याने सिनीअर ॲडवायझर दुर संचार विभाग न्यु दिल्ली व दिल्ली सीबीआय अधिकारी आरोपीत क्रं. २ याने त्याचे मोबाईल क्रंमांकावरुन संपर्क करुन त्यांनी आपसात संगणमत करुन, फिर्यादीचे ओळखीचे मोबाईल क्रं सांगुन तो फिर्यादीचे नावावर असुन त्याव्दारे आधार कार्डव्दारे फिर्यादीचे नावाने कॅनरा बँक खाते काढुन ते नरेश गोयल यांना ५ लाख रु मध्ये विकले आहे व त्यात परदेशातुन २ कोटी रु इतकी रक्कम जमा झाली असुन त्यात फिर्यादीला २० लाख रु कमीशन मिळालेली आहे व सीबीआय इंडिया येथे गुन्हा दाखल असुन फिर्यादीस डिजीटल अरेस्ट करण्यात आलेली आहे. याबाबत कोणशी चर्चा करायची नाही अशी भिती घालुन फिर्यादीस व्हॉटस ॲपव्दारे वेगवेगळया विभागाचे खोटे इंग्रजी भाषेतील बनावट कागदपत्रे व सुप्रीम कोर्टाचे ऑर्डरचे कागदपत्र व बँक खात्याचे कागदपत्र पाठवुन फिर्यादीकडुन वेगवेगळया बँक खात्यामध्ये वरील वर्णनाची रक्कम ट्रान्स्फर करण्यास भाग पाडुन, ऑनलाईन फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- पोनि- गजा- सायबर पोलीस ठाणे- **९०११५८०१००** |